# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. २८१/२०२२

**विषय:** ऑक्टोबर/नोव्हेंबर,२०२२ (नियोजन डिसेंबर,२०२२) हिवाळी सत्राच्या परीक्षा आयोजनाबाबत.

विद्यापीठ अधिकार मंडळांनी वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार व निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व विद्याशाखांतील सर्व अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर,२०२२ (नियोजन डिसेंबर,२०२२) परीक्षांचे आयोजन पारंपारिक (ऑफलाईन) पध्दतीने करण्यात आलेले आहे. याबाबतची मार्गदर्शक तत्वे व सूचना खालीलप्रमाणे :

१ शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मधील ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२२ पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नियमित व अनुशेषित परीक्षा आवेदनपत्र भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे आयोजन टप्प्याटप्प्याने २७ डिसेंबर, २०२२ पासून फक्त पारंपारिक (ऑफलाईन) पध्दतीने करण्यात आलेले आहे.

२ संबंधित परीक्षांची वेळापत्रके विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर टप्प्याटप्प्याने प्रसिध्द करण्यात येतील. विद्यार्थ्यांनी वेळोवेळी वरील संकेतस्थळावरुन माहिती घ्यावी.

३ प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष विद्यार्थ्यांच्या जुन्या अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर,२०२२ (नियोजन डिसेंबर,२०२२) या हिवाळी सत्राच्या परीक्षा या समकक्ष विषयानुसार आयोजित करण्यात आलेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी विद्यापीठ संकेतस्थळावर अभ्यासक्रम अंतर्गत जाहीर करण्यात आलेले समकक्ष विषय जाणून घेऊन त्याप्रमाणे अभ्यास करुन परीक्षा द्यावी.

४ शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मधील ऑक्टोबर/नोव्हेंबर,२०२२ (नियोजन डिसेंबर,२०२२) पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या नियमित व अनुशेषित आवेदनपत्र भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या परीक्षा या १०० टक्के अभ्यासक्रमांवर आधारीत असतील.

५ संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य /संचालक यांनी परीक्षार्थींच्या बैठक व्यवस्थेचे नियोजन नियमानुसार करावे. विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था करीत असताना एक बेंचवर एकाच विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था करण्यात यावी. तसेच आवश्यकतेनुसार हवा व उजेड यासाठी पंखे व विजेच्या दिव्यांची पुरेशी व्यवस्था करण्यात यावी.

६ काही महाविद्यालयांमध्ये जर आवश्यक बैठक व्यवस्थेकरिता बेंच उपलब्ध नसतील तर संबंधित प्राचार्यांनी तात्पुरत्या व्यवस्थेची सोय करावी. तसेच विद्यापीठ नियमाप्रमाणे बैठक व्यवस्था करण्याची जबाबदारी संपूर्णपणे महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक आणि महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांची राहील.

७ परीक्षा केंद्रावर आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्यार्थ्यांचे साहित्य ठेवण्याची व्यवस्था व दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता तळमजल्यावर विशेष खोलीची व्यवस्था करण्यात यावी.

८ विद्यार्थ्यांनी कोणत्याही परिस्थितीमध्ये मोबाईल/इलेक्ट्रॉनिक उपकरणे परीक्षा कक्षामध्ये आणू नयेत हे पूर्णपणे नियमबाहय व आक्षेपार्ह आहे. मोबाईल/उपकरणे हरविल्यास /चोरी गेल्यास/गहाळ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची असेल. याबाबत संबंधित महाविद्यालयातील परीक्षा अधिकारी यांनी सूचना देऊन दक्षता घ्यावी.

९ विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरु होण्यापूर्वी अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रावर हजर राहणे अनिवार्य आहे. याबाबतच्या पूर्वसूचना संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

१० काही कारणामुळे विद्यार्थ्यांचे बारकोड संबंधित परीक्षा केंद्रास प्राप्त झालेले नसतील तर त्यांना इमर्जन्सी बारकोड देऊन परीक्षा देण्याची व्यवस्था करण्यात यावी. याबाबत संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांनी विशेष दक्षता घ्यावी.

११ प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एल.एल.बी. व बी.ए.एल.एल.बी. या अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर,२०२२ (नियोजन डिसेंबर,२०२२) परीक्षाबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार संबंधित महाविद्यालय हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम, ४८ (१) (च) नुसार केंद्रिय मूल्यमापन प्रकल्प केंद्र (कॅप) म्हणून मान्यता देण्यात येत आहे. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य / संचालक हे त्या केंद्रिय मूल्यमापन प्रकल्प केंद्राचे (कॅप) संचालक म्हणून कामकाज पाहतील.

१२ विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रथम वर्ष बी.ए.,बी.कॉम. व बी.एस्सी. सोडून सर्व अभ्यासक्रमांच्या केंद्रिय मूल्यमापन प्रकल्प केंद्राबाबत (कॅप) परीक्षा विभागामार्फत स्वतंत्रपणे पत्राद्वारे अवगत करण्यात येईल.

१३ केंद्रिय मूल्यमापन प्रकल्प केंद्र (कॅप) प्राचार्य /संचालक यांना कळविण्यात येते की, परीक्षेच्या तिस—या दिवसापासून केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प सुरु करण्यात यावे व तपासून झालेल्या उत्तरपत्रिका तात्काळ विद्यापीठ परीक्षा विभागात जमा करण्यात याव्यात. याबाबतच्या सूचनावलीचे पत्र स्वतंत्रपणे परीक्षा—छाननी व तालिनीकरण कक्षामार्फत प्रसिध्द करण्यात येईल.

१४ विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार ऑक्टोबर/नोव्हेंबर,२०२२ (नियोजन डिसेंबर,२०२२) आयोजन करण्यासाठी संबंधित महाविद्यालयास परीक्षा केंद्र म्हणून मान्यता देण्यात येत आहे. नविन महाविद्यालयांनी सादर केलेल्या परीक्षा केंद्राच्या प्रस्तावाबाबत परीक्षा विभागाद्वारे नियुक्त समिती भेट देईल व समितीने सादर केलेल्या अहवालावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाने दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१५ ज्या प्राध्यापकांना भरारी पथक सदस्य/वरिष्ठ बाहय पर्यवेक्षक/स्थायी निरिक्षक परीक्षा आयोजनाबाबत परीक्षा विभागाकडून वेळोवेळी आदेश प्राप्त होतील. त्यांनी संबंधित काम करणे हे महाराष्ट सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४८ ४ नुसार बंधनकारक आहे. संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अशा प्राध्यापकांना नमूद कालावधीकरिता परीक्षा कामकाजासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.

१६. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठ परीक्षा व परिपत्रक १०४/२०२२ नुसार स्पर्धात्मक परीक्षा एकाच दिवशी एकाच वेळेस येत असल्यास परिपत्रकातील नमूद कारणांकरिता विशेष परीक्षांचे आयोजन परिपत्रक क्र. १०४ अन्वये कार्यवाही करण्यात येईल. सदर विशेष परीक्षांची नियमावली इन—सेम परीक्षेस लागू असणार नाही याची नोंद घ्यावी.

१७ सदर परीक्षा सुरळीतपणे पूर्ण करण्यासाठी विद्यापीठाने सर्वतोपरी दक्षता घेतली असून त्याकरिता सर्व उपाययोजना केलेल्या आहेत. याकरिता सर्व संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या असून दक्षता/ भरारी पथके यांची नियुक्ती केलेली आहे.

१८ सदर परीक्षेवेळी संबंधित परीक्षा केंद्रांना योग्य वेळी ऑनलाईन पध्दतीने प्रश्नपत्रिका प्राप्त झाली नाही तर ०२०—२५६२१४५३ या दूरध्वनी क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा.

१९ प्राचार्य/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना कळविण्यात येते की, त्यांनी आपले मोबाईल क्रमांक परीक्षा कामकाजाकरिता अद्ययावत करुन घ्यावेत.

२० जर संबंधित परीक्षा केंद्रांना परीक्षा आयोजन करण्यासाठी उत्तरपत्रिका व इतर आवश्यक साधनसामुग्री प्राप्त झाली नसल्यास त्यांनी (०२०)२५६२१४६०/१४६२ या क्रमांकावर संपर्क साधून परीक्षा गोदाम कक्षातून आवश्यक साधनसामुग्री घेऊन जाण्याची व्यवस्था करावी.

२१ दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे सोयी व सवलती देय राहतील. तसेच या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी २० मिनिटे अधिकचा वेळ देय राहील.

२२ सदर परीक्षेदरम्यान विद्यार्थ्याने गैरप्रकार केल्याचे आढळून आल्यास सदर विद्यार्थी हा विद्यापीठ अध्यादेश आदेश क्र. ०९ नुसार कारवाईस पात्र असेल.

२३ मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार ऑक्टोबर/नोव्हेंबर,२०२२ (नियोजन डिसेंबर,२०२२) पारंपारिक (ऑफलाईन) पध्दतीने आयोजन करण्यात आलेल्या परीक्षासाठी छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा लागू राहील. याबाबत विद्यार्थ्यांना संबंधित विभागामार्फत स्वतंत्र पत्राद्वारे कळविण्यात येईल. (आदेश क्र. १८४ अ व ब नुसार)

२४ प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एलएलबी आणि बीएएलएलबी परीक्षांचे आयोजन करताना महाविद्यालयाच्या उत्तरपत्रिकांचा वापर करावा. या परीक्षांचे आयोजन करताना विद्यापीठाच्या उत्तरपत्रिकांचा वापर करू नये तसेच याकरिता बारकोड महाविद्यालयांना देण्यात येणार नाहीत.

२५ परिपत्रक क्र. १२५ अंतर्गत येणा—या अभ्यासक्रमांच्या परीक्षाचे नियोजन महाविद्यालय स्तरावर विद्यापीठाच्या परीक्षांच्या नियोजनाच्या धर्तीवर करण्यात यावे. याबाबत परीक्षकांची यादी व वेळापत्रक विहीत मुदतीत परीक्षा विभागाकडे सादर करुन आवश्यक मान्यता घेऊन कार्यवाही करावी.

२६ ज्या महाविद्यालयांमध्ये काही कारणांमुळे परीक्षा आयोजन करणे शक्य नसेल अशा महाविद्यालयांनी जवळच्या महाविद्यालयात परीक्षा आयोजनाबाबतचा पत्रव्यवहार विनाविलंब परीक्षा विभागाकडे सादर करण्यात यावा. प्रस्ताव सादर करताना दुस—या महाविद्यालयाचे “ना—हरकत प्रमाणपत्र” जोडण्यात यावे.

मा. प्राचार्य/ संचालक/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करुन याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे व त्यांच्या शंकांचे निरसन करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा—समन्वय/ ९१८
दिनांकः- २३/१२/२०२२

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा.